**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## महाराष्ट्र शासनातर्फे माजी कुलगुरु डॉ. विलास सपकाळ यांची प्रचलित अभ्यासक्रमातील सुधारणा - कौशल्य विकास समितीच्या अध्यक्षपदी निवड

अमरावती.

महाराष्ट्र शासनाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी विभागाचे विभागप्रमुख तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. विलास सपकाळ यांची प्रचलित अभ्यासक्रमातील सुधारणा – कौशल्य विकास समितीवर अध्यक्षस्थानी निवड केली आहे. या समितीमध्ये सदस्य म्हणून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांवचे प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद माहुलीकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन शिक्षण विभागप्रमुख डॉ. प्रफुल्ल पवार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राचे प्र-संचालक डॉ. पुजा मोरे, पुणेचे सनदी लेखापाल श्री रविंद्र दहाड, शिक्षणतज्ज्ञ श्रीमती अपूर्वा पालकर, श्री आनंद मापूस्कर, तर समन्वयक म्हणून महाराष्ट्र राज्याचे उच्चशिक्षण संचालक डॉ. धनराज माने आहेत.

नवीन कायद्यानुसार महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणात कौशल्य शिक्षणाचा अंतर्भाव करण्याबाबत महत्वाचे उद्दिष्ट विद्यापीठांकरिता सूनिश्चित करण्यात आले आहे, यासाठी विद्यापीठांनी प्रयत्न सुरु केले असून विविध स्वरुपाची कौशल्ये विकसित करण्यासाठी महाराष्ट्रातील विद्यापीठांनी अभ्यासक्रम सुरु केले आहेत. विद्यापीठांमध्ये सुरु झालेल्या अशाप्रकारच्या अभ्यासक्रमांचे व विचारांचे आदानप्रदान तातडीची गरज झाली असून त्यावर विचारविनिमय करण्याकरिता शासनाने माजी कुलगुरु डॉ. विलास सपकाळ यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली.

या समितीकडे विद्यापीठांनी कौशल्य शिक्षण व विकाससंदर्भात स्वीकृत करण्यात आलेल्या विविध योजना, सुरु करण्यात आलेले विविध अभ्यासक्रम, चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टीमचा आराखडा, कौशल्ये तपासणीसाठी स्वीकृत केलेली परीक्षापद्धती याबाबतची माहिती तातडीने उच्चशिक्षण संचालकाकडे पाठवावयाची आहे. यासंदर्भात शासनाद्वारे जुलै महिन्यामध्ये सर्व अकृषी विद्यापीठांचे प्र-कुलगुरु, अधिष्ठाते यांची सहविचार सभा विशेष समितीसोबत आयोजित करण्यात येणार असून प्रत्येक विद्यापीठाला वीस मिनीटांचे सादरीकरण करावयाचे आहे. माजी कुलगुरु डॉ. विलास सपकाळ यांची विशेष समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, आय.आय.एल. चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०५/०७/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी